**<u>प्रेसनोट</u>**

जा.क्र. पोउआ/वाहतूक/२८८९/२०२४ पुणे शहर, दिनांक - १२.०४.२०२४

**<u>विषय</u> :- भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती निमित्त पुणे स्टेशन, अरोरा टॉवर कॅम्प, विश्रांतवाडी व दांडेकर पुल या परिसरातील वाहतूक व्यवस्थेतील बदलाबाबत.**

--------oo---------

रविवार, दिनांक- १४ एप्रिल २०२३ रोजी, भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती असल्याने समाजातील सर्व स्तरातील नागरीक पुणे शहर व बाहेर गावाहून मोठया प्रमाणात मिरवणूकीने व निरनिराळे वाहनातून १) जिल्हाधिकारी कार्यालयासमोरील डॉ. बाबासाहेब आंबेडकर उद्यान पुणे स्टेशन येथील पुतळा,२) अरोरा टॉवर चौकातील पुतळा ३)विश्रांतवाडी चौक ते कळस फाटा व कळसफाटा ते विश्रांतवाडी चौक परिसरात येत असतात. सदर मिरवणूकांमध्ये मोठ्या प्रमाणात रस्त्याचे दोन्ही बाजूस गर्दी होत असते त्यामुळे सदर ठिकाणांवर वाहन चालकांची गैरसोय होऊ नये व वाहतुक सुरक्षीत व सुरळीतपणे चालने करिता महाराष्ट्र शासन गृह विभाग क्र.एम.व्ही.ए.०१९६/८७१/सीआर-३७/टिआरए-२,दिनांक-२७/०९/१९९६ चे नोटीफीकेशन नुसार मोटार वाहन कायदा कलम ११५,११६(१) (ए) (बी),११६(४) आणि ११७ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करुन मी, रोहिदास पवार, पोलीस उप आयुक्त, वाहतुक शाखा पुणे शहर, अत्यावश्यक सेवेतील वाहने (उदा.फायरब्रिगेड,पोलीस वाहने,रुग्णवाहिका इ.) खेरीज करुन सदर परिसरातील वाहतूकीत नमुद केलेल्या वेळेनुसार व आवश्यकतेनुसार तात्पुरत्या स्वरुपात खालील प्रमाणे बदल करण्यात येणार आहे.

## <u>१.जिल्हाधिकारी कार्यालय परिसर</u>

❖ **शाहिर अमर शेख चौक** - शाहिर अमर शेख चौकाकडून मालधक्का चौकाकडे जाणारी वाहतूक शाहिर अमर शेख चौकातून वळविण्यात येत आहे.

✓ **पर्यायी मार्ग** - शाहिर अमर चौकाकडून मालधक्का चौकाकडे जाणारी वाहने आरटीओ चौक – जहांगीर चौक मार्गे इच्छित स्थळी जातील.

❖ **जीपीओ चौक** – जीपीओ चौकातून बोल्हाई चौकाकडे जाणारी वाहतूक जीपीओ चौकातून वळविण्यात येत आहे.

✓ **पर्यायी मार्ग** - जीपीओ चौकातून बोल्हाई/मालधक्का चौकाकडे जाणारी वाहतूक किराड चौक – नेहरू मेमोरियल चौक मार्गे इच्छित स्थळी जाईल.

❖ **पुणे स्टेशन चौक**- पुणे स्टेशन चौकातून मालधक्का चौकाकडे जाणारी वाहतूक पुणे स्टेशन चौकातून वळविण्यात येणार आहे.

✓ **पर्यायी मार्ग** – पुणे स्टेशन - अलंकार चौक मार्गे इच्छितस्थळी

❖ **नरपतगिरी चौक** :- नरपतगिरी चौकाकडून मालधक्का चौकाकडे जाणारी वाहतूक नरपतगिरी चौकातून वळविण्यात येत आहे.

✓ **पर्यायी मार्ग** :- नरपतगिरी चौक - १५ ऑगस्ट चौक - कमला नेहरु हॉस्पीटल, पवळे चौक, कुंभारवेस चौक मार्गे इच्छितस्थळी जातील.

❖ **बॅनर्जी चौक** :- बॅनर्जी चौकाकडून शाहीर अमर शेख चौकाकडे जाणारी वाहतूक बॅनर्जी चौकातून वळविण्यात येत आहे.

✓ **पर्यायी मार्ग** :- बॅनर्जी चौकाकडून पॉवर हाऊस चौक, नरपतगिरी चौक, १५ ऑगस्ट चौक, कमला नेहरु हॉस्पीटल, पवळे चौक, कुंभारवेस चौकातून इच्छितस्थळी जातील.

❖ ससुन हॉस्पीटल येथील अत्यावश्यक रुग्णांसाठी मार्ग - ससुन हॉस्पीटल येथील डेड हाऊस शेजारील गेटने प्रवेश देण्यात येत आहे.

**वरील नमूद वाहतूक व्यवस्थेतील बदल हे दिनांक १४ एप्रिल २०२४ रोजी ०६.०० वा.पासुन गर्दी संपेपर्यंत तात्पुरते अंमलात राहतील.**

## पार्किंग व्यवस्थेबाबत

- ❖ मालधक्का चौक ते बोल्हाई चौक ते पुणे स्टेशन, बोल्हाई चौक ते साधु वासवानी चौक, बोल्हाई चौक ते जी.पी.ओ., बोल्हाई चौक ते नरपतगीर चौक, फोटोझिंको प्रेस उपरस्ता व बोल्हाई चौक ते डॉ.बॅनर्जी चौक या रस्त्यांवर अत्यावश्यक सेवेखेरीज सर्व प्रकारची वाहनांना नो-पार्किंग करण्यात येत आहे.
- ✓ जिल्हाधिकारी कार्यालयासमोरील डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळयास अभिवादन करावयास येणा-या भाविकांच्या वाहनांकरीता आर.टी.ओ.शेजारी एस.एस.पी.एम.एस. मैदान (दुचाकी व चारचाकी वाहने), पुणे स्टेशन येथील तुकाराम शिंदे वाहनतळ (दुचाकी व चारचाकी वाहने), व ससून कॉलनी येथे (दुचाकी वाहने) अशी पार्किंगची व्यवस्था करण्यात आली असून भावीकांनी आपली वाहने सदर पार्किंगचे ठिकाणीच पार्क करुन प्रशासनास सहकार्य करावे.

## २.अरोरा टॉवर परिसर

- ❖ **डॉ.कोयाजी रोड /तीन तोफा चौक** :- डॉ. कोयाजी रोड वरुन (सिल्व्हर जुबली मोटर्स) नेहरु चौकाकडे जाणारी वाहतूक तीन तोफा चौक येथे वळविण्यात येत आहे.
- ✓ **पर्यायी मार्ग** :- डॉ. कोयाजी रोड - तीन तोफा चौक – एस.बी.आय. हाऊस चौक मार्गे इच्छितस्थळी

- ❖ **ईस्कॉन मंदिर चौक** :- ईस्कॉन मंदिर चौकाकडून डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा, अरोरा टॉवरकडे जाणारी वाहतूक ईस्कॉन मंदिर चौकातून वळविण्यात येत आहे.
- ✓ **पर्यायी मार्ग** :- डॉ. कोयाजी रोड - तीन तोफा चौक – एस.बी.आय. हाऊस चौक मार्गे इच्छितस्थळी
- ❖ **नेहरु चौक** :- नेहरु चौकाकडुन तीन तोफा चौकाकडे जाणारी वाहतुक नेहरु चौकातून वळविण्यात येत आहे.
- ✓ **पर्यायी मार्ग** :- नेहरु चौकातून - किराड चौक - ब्ल्यु नाईल चौक – एस.बी.आय. हाऊस मार्गे इच्छितस्थळी
- ❖ **नाझ चौक** :- महात्मा गांधी रोडवरुन नाझ चौकातून अरोरा टॉवरकडे जाणारी वाहतुक नाझ चौकातून वळविण्यात येत आहे.
- ✓ **पर्यायी मार्ग** :- नाझ चौक डावीकडे वळून बाटलीवाला बगीचा मार्गे इच्छितस्थळी

## पार्किंग व्यवस्थेबाबत

- ❖ दोराबजी चौक ते अरोरा टॉवर ते तीन तोफा चौक व अरोरा टॉवर ते नाझ चौक, तारापोर रोड जंक्शन या रस्त्यांवर सर्व प्रकारचे वाहनांकरीता नो पार्किंग करण्यात येत आहे.
- ✓ अरोरा टॉवर चौकातील डॉ.आंबेडकर यांचे पुतळयास अभिवादन करण्यासाठी येणा-या भाविकांनी आपली वाहने तारापोर रोड, ईस्ट स्ट्रीट व अन्य रस्त्यांवरील पे-ॲण्ड पार्कच्या ठिकाणी पार्क करावीत.

**वरील नमूद अरोरा टॉवर परिसरातील वाहतूक व्यवस्थेतील बदल हे दिनांक १४ एप्रिल २०२४ रोजी ०६.०० वा.पासुन गर्दी संपेपर्यंत तात्पुरते अंमलात राहतील.** मिरवणूक मार्गांवरील वाहतूक आवश्यकतेनुसार/ टप्या-टप्याने बंद अथवा इतर पर्यायी मार्गांनी वळविण्यात येणार आहे.

## ३.विश्रांतवाडी परिसरातील वाहतूक व्यवस्थेतील बदलाबाबत.

| अ.नं. | मुख्य मार्ग | पर्यायी मार्ग |
|---|---|---|
| १ | विश्रांतवाडी चौकातुन एअरपोर्ट, टिंगरेनगरकडे जाणारी वाहने | विश्रांतवाडी चौकातुन एअरपोर्ट, टिंगरेनगरकडे जाणाया वाहनांना मेंटल कॉर्नर चौकातुन उजवीकडे वळुन कॉमर्स झोन चौकातुन उजवीकडे वळुन टिंगरेनगर एअरपोर्ट रोडकडे जातील. तसेच मेंटल कॉर्नर चौकातुन उजवीकडे पोस्ट ऑफिस चौकातुन डावीकडे वळुन एअरपोर्ट रोडकडे जातील. |
| २ | विश्रांतवाडी चौकाकडुन बोपखेल, दिघी, भोसरी, आळंदीकडे जाणारी वाहने **(फक्त दुचाकी वाहने )** | विश्रांतवाडी चौकातुन बोपखेल, दिघी, भोसरी, आळंदीकडे जाणारी दुचाकी वाहनांना शांतीनगर चौकातुन डावीकडे वळुन पुढे १०० मीटर अंतरावर उजवीकडे वळुन पर्यायी मार्गाने चव्हाण चाळ सरळ मच्छी मार्केट पर्यंत सरळ जावुन डावीकडे वळुन कळस फाटा येथे येवुन बोपखेल मार्गे आळंदी रोडला मिळतील. या वैतिरिक्त रिक्षा,चारचाकी व अवजड वाहनांनो मेंटल कॉर्नर चौकाचे पुढे जाण्यास बंदी आहे. |
| ३ | विश्रांतवाडी चौकातुन बोपखेल, दिघी, भोसरी, आळंदीकडे जाणारी **(रिक्षा,कार,व जड वाहने )** | विश्रांतवाडी चौकातुन बोपखेल,दिघी,भोसरी आळंदीकडे जाणारे रिक्षा,कार,व जड वाहने ही चंद्रमा चौक्‍ातुन होळकर ब्रिज मार्गे सरळ खडकी मार्गे जातील. |
| ४ | विश्रांतवाडी चौक्‍ाकडे आळंदी म्हस्के वस्ती, बोपखेल, दिघी, आळंदीकडुन येणारी **(दुचाकी वाहने)** | बोपखेल कडुन येणारी दुचाकी वाहने ही मच्छी मार्केट चव्हाण चाळीतुन उजवीकडे वळुन सरळ पर्यायी मार्गाने शांतीनगर टँक रोड येथे येवुन टँक रोडने खडकीकडे किंवा डावीकडे वळुन शांतीनगर चौकाकडे येवुन मेन्टल कॉर्नर मार्गे जातील. |
| ५ | विश्रांतवाडी चौक्‍ाकडे आळंदी म्हस्के वस्ती, बोपखेल, दिघी, आळंदीकडुन येणारी **(रिक्षा,कार,व जड वाहने )** | आळंदी,दिघी कडुन बोपखेलकडे येणारी व विश्रांतवाडी चौकाकडे जाणारी रिक्षा,कार,व जड वाहने ही बोपखेल चौकातुन मागे फिरवुन दिघी जकात नाका येथे पाठवतील. |
| ६ | धानोरीकडुन विश्रांतवाडी चौकाकडे येणारी वाहने | विश्रांतवाडीकडे येणारी वाहने ही आनंद मंगल कार्यालया शेजारील रोड किंवा भरत ढाबा शेजारील रोडने एअरपोर्ट रोडवर येवुन ५०९ चौकातुन पुण्याकडे जातील. |
| ७ | खडकी बाजार कडुन टँक रोड वरुन विश्रांतवाडी कडे येणारी वाहने | खडकी बाजाराकडुन विश्रांतवाडी कडे टँक रोडने येणारी रिक्षा,चारचाकी व अवजड वाहनांना पुर्णपणे बंदी करण्यात येत आहे. सदरची वाहने ही होळकर ब्रिज मार्गे चंद्रमा चौक या ठिकाणी येवुन पुढे जातील. **(खडकी वाहतुक विभाग,पुणे शहर)** |
| ८ | ५०९ चौकातुन विश्रांतवाडी कडुन आळंदी दिघी किंवा मेन्टल कॉर्नर कडे जाणारे वाहने | ५०९ चौकाकडुन विश्रांतवाडीकडे येणारी वाहने ही जेलरोड मार्गे गोल्फ चौकातुन आंबेडकर चौक,आळंदी जंक्शन,चंद्रमा चौक मार्गे जातील. **(विमानतळ वाहतुक विभाग,पुणे शहर)** |
| ९ | पोरवाल रोड जंक्शन येथुन विश्रांतवाडीकडे येणारी वाहने | पोरवाल चौक,लोहगाव कडुन विश्रांतवाडी कडे येणारी रिक्षा,चारचाकी व बसेस हया लोहगाव गाव पेट्रोलसाठा चौक,५०९ चौक मार्गे पुढे जातील. **(विमानतळ वाहतुक विभाग,पुणे शहर)** |

**वरील नमूद विश्रांतवाडी परिसरातील वाहतूक व्यवस्थेतील बदल हे दिनांक १४ एप्रिल २०२४ रोजी १५.०० वा.पासुन गर्दी संपेपर्यंत तात्पुरते अंमलात राहतील.** मिरवणूक मार्गांवरील वाहतूक आवश्यकतेनुसार/टप्प्या-टप्प्याने बंद अथवा इतर पर्यायी मार्गांनी वळविण्यात येणार आहे.

## **४.सिंहगड रोड जंक्शन (दांडेकर पुल) परिसरातील वाहतूक व्यवस्थेतील बदलाबाबत.**

१. **स्वारगेट कडुन सिंहगड रोडला जाणारी वाहतुक :**

- सावरकर चौक ते थोरले बाजीराव पेशवे पथ (सणस मैदान पथ कॉर्नर) ते कल्पना हॉटेल चौक ते ना.सी.फडके ते मांगीरबाबा चौक ते सेनादत्त पोलीस चौकी चौक ते बालशिवाजी ते आशा हॉटेल चौकातुन सिंहगड रोडकडे

२. **सिंहगड रोड कडुन स्वारगेट कडे जाणारी वाहतुक :**

- आशा हॉटेल चौकातुन डावीकडे वळुन ते बालशिवाजी ते सेना दत्त पोलीस चौकी चौक ते मांगीरबाबा चौक ते ना.सी. फडके चौक ते कल्पना हॉटेल चौक ते सणस पुतळा चौक सोयीनुसार

३. **शास्त्रीरोड कडुन येणारी वाहतूक :**

- सेनादत्त चौकाकडुन येणारे वाहने डावीकडे मांगीर बाबाचौकाकडुन ना.सी.फडके चौकाकडे पुढे

वरील प्रमाणे डॉ बाबासाहेब आंबेडकर जयंती निमित्त दिनांक १३/४/२०२४ रोजी १९/०० वा ते दिनांक १४/०४/२०२४ रोजी रात्रौ ०२/०० वा पर्येत तसेच दिनांक १४/०४/२०२४ रोजी १६/०० ते २१/००पर्यंत आवश्यतेनुसार वाहतूकीत बदल करण्यात येणार आहेत.

याखेरीज पुणे शहरात अनेक ठिकाणाहून डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळयापर्यंत मिरवणूका निघणार असल्याने, मिरवणूक मार्गांवरील वाहतूक आवश्यकतेनुसार/टप्या-टप्याने बंद अथवा इतर पर्यायी मार्गांनी वळविण्यात येणार आहे.

तरी वाहन चालकांनी पर्यायी मार्गांचा वापर करून होणारी गैरसोय टाळावी व पोलीसांना सहकार्य करावे.

**( रोहिदास पवार )**
**पोलीस उप-आयुक्त, वाहतूक,**
**पुणे शहर.**

**प्रत** :- १. जिल्हा प्रसिध्दी अधिकारी पुणे-१, स्थानिक वृत्तपत्रात बातमी स्वरुपात प्रसिध्दी देणेकामी
२. सहाय्यक पोलीस आयुक्त,परिमंडळ-१,२,३ वाहतुक शाखा पुणे शहर
३. सर्व प्रभारी अधिकारी,वाहतुक शाखा पुणे शहर
४. पोलीस निरीक्षक, प्रेसरुम पोलीस आयुक्त कार्यालय, पुणे.

२/-सदर प्रेसनोटच्या प्रती पत्रकारांना देवून, सदरची बातमी वर्तमानपत्रातून प्रसिध्द करण्याची विनंती करावी.

**प्रत सादर,**
पोलीस उप आयुक्त, विशेष शाखा-१ पुणे शहर